



# नव्या ज्ञानमंदिरांच्या प्रतीक्षेत नाशिक

नाशिकच्या विकासाचा शिक्षण क्षेत्राचा धांडोळा घेतला असता, शिक्षण क्षेत्रातही अनेक विद्याशाखांची वानवा आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या लाटेने देशातील अन्य शहरे जशी उजळून निघाली. माहिती तंत्रज्ञानाच्या लखलखीत प्रकाशाने झगमगून गेली, त्यामानाने नाशिक अजूनही संधिप्रकाशाच्याच कात्रीत सापडले आहे. राजकीय आणि सामाजिक इच्छाशक्तीअभावी कालच्या सुधारणांचा पाऊस आमच्या गावात पडलाच नाही, अशी एकूणच या शहराची स्थिती झाली आहे.

**बाळासाहेब वाघ**, अध्यक्ष,
के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

गेल्या दशकभरात आयटी क्षेत्राचा विकास होण्याच्या अनेक शक्यता असतानासुद्धा आयटी सेक्टर नाशिकला बहरू शकले नाही. औद्योगिक क्षेत्रातही प्रचंड पडझड होत असून, वेगवेगळ्या सरकारांच्या कारकीर्दीत लघुउद्योगांची प्रचंड प्रमाणात पडझड झाली. मोठे उद्योग कसेबसे तग धरून आहेत. अलीकडे उदयास आलेले दोन- चार कृषी उद्योगसोडता कृषीसमृद्धी बहरलेली असतानासुद्धा कृषी आधारित उद्योग येथे मुळं धरू शकले नाहीत. या सर्वांचा परिणाम नाशिकच्या शिक्षण क्षेत्रावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या झाला आहे. विकासाचा आधुनिक चेहरा घेऊन ज्या द्रुतगतीने नाशिकचा लौकिक जसा समोर यायला हवा होता, तसा येऊ शकला नाही. आदी नाशिकचे वेगळेपण आणि परंपरांचा विचार करता पहिले चित्रपटनिर्माते स्वर्गीय दादासाहेब फाळके यांचे हे जन्मगाव. फाळके नावाच्या या चित्रपटसृष्टीच्या दादाने संपूर्ण फिल्मजगत आलोकित केले आहे. त्यांच्या नावाने दादासाहेब फाळके फिल्म पुरस्कार देशभरातील प्रतिभावंत कलाकारांना देण्यात येतो. परंतु त्यांच्या जन्मगावी नाशिकला त्यांचा वारसा सांगणारी एकही चित्रपट संस्था नसावी, यापेक्षा दुसरे दुर्दैव ते काय असू शकते. दादासाहेब फाळकेंच्या स्मृती चिरंतन ठेवण्यासाठी त्यांच्या नावाने स्वतंत्र कला अकादमी नाशिकला होणे अत्यंत गरजेचे आहे. स्वतंत्र कला अकादमी हीच नाशिकची ओळख होऊ शकते.

नाशिकच्या पश्चिम, दक्षिण आणि उत्तरेस मोठा भूभाग आदिवासी लोकवस्तीने वेढला आहे. सह्याद्री आणि कळसूबाईच्या डोंगररांगाच्या कडेकपारीत राहणाऱ्या, पश्चिमेला त्र्यंबकेश्वरपासून ठाणे जिल्ह्यापर्यंत व्याप्त नानाविध आदिवासी जाती-जमातींनी वेढलेला प्रदेश किंवा उत्तरेच्या पेठ, सुरगाण्यातील आदिवासींची वस्ती ही खरंतर एका अभिजात कला संस्कृतीची बलस्थाने आहेत. आदिवासी संस्कृती परंपरागत नृत्य, नाट्य आणि चित्रकलेच्या विहंगम संगमाने ती बहरली आहे. वारलीसारखा अभिजात चित्रकलेचा प्रकार या आदिम जमातीकडून प्रगत मानवाला मिळाला आहे. आदिवासींच्या नृत्यपरंपरेत निसर्गाची अतूट लय, अन हर्षोन्मादाचा बेफाम आनंद आहे. जल, जमीन आणि जंगलांचे तेच खरे पोशिंदे आहेत. आदिवासींची कलापरंपरा शिकून, निसर्ग आणि कला यांच्या संमिश्रणाचे विज्ञान शिकून त्या पद्धतीने कलासंस्कृती जोपासणारी ज्ञानपीठे शहरवासीयांनी निर्माण करणे अपेक्षित होते. परंतु आधुनिकतेचा खरा अर्थ आम्ही जुने ते त्यागून पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करणे, असा लावला अन् अंध समजुतीच्या वावटळीत वारली पेंटिंग, पारंपरिक नृत्य अन् आदिवासी कलांना कालबाह्य ठरवत त्यांच्यातील सत्त्व आम्ही जाणलेच नाही, पर्यायाने या कलागुणांचा विकास करणाऱ्या संस्था स्थापन होऊ शकल्या नाहीत.

फळाफुलांनी बहरलेल्या अन् कृषीसंपन्नतेचा वारसा लाभलेल्या नाशिकला कृषी तंत्रज्ञ घडविण्यासाठी कृषी शिक्षणावर आधारित वेगवेगळ्या अभ्यासक्रमाची नितांत आवश्यकता आहे. शेतीमातीचे शिक्षण घेऊन आधुनिक शेतीला आकार देणाऱ्या आधुनिक नवशेतकऱ्यांची नवीन पिढी घडविण्याची आवश्यकता आहे. या आवश्यकतेला अनुसरून दशकापूर्वी कृषी शिक्षणाच्या विविध सहा ज्ञानशाखांची महाविद्यालये आमच्या के. के. वाघ शिक्षण संस्थेने चालविली आहेत. परंतु अजूनही उद्यानविद्या (Horticulture), पुष्पकृषीविद्या (Floriculture), Dairy, Fishery व animal husbandry या सारख्या कलाशाखा विकसित करणे गरजेचे आहे.

द्राक्ष, डाळिंब, कांदा मोठ्या प्रमाणात पिकविणाऱ्या नाशिकला केंद्र सरकारने अन्नप्रक्रिया व फळप्रक्रिया उद्योग उभारणे नितांत गरजेचे आहे. याशिवाय अभियांत्रिकी शिक्षणाला ज्याप्रमाणे पदविका अभ्यासक्रम (Diploma in Engineering) शिकविला जातो. त्याचप्रमाणे कृषी शिक्षणामध्ये कृषी पदविका (Diploma) प्रदान करणारी कृषी तंत्रनिकेतने निर्माण होणे जरूरीचे आहे. पदविका अभ्यासक्रमातूनच प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर जाऊन काम करणारे कुशल कामगार, तंत्रज्ञ निर्माण होतात. कृषी पदविका अभ्यासक्रमाचा सरकारने प्राधान्यक्रमाने विचार करून नाशिकसारख्या शहरात अशा कृषी पदविका महाविद्यालयांना चालना देणे गरजेचे आहे.

रुद्राक्ष-संस्कृतीतून द्राक्ष संस्कृतीकडे झेपावणाऱ्या नाशिकने इथे मुबलक पिकणाऱ्या द्राक्षांना अनुसरून वायनरी उद्योग उभे केले. परंतु हे वायनरी उद्योग चालविण्यासाठी गुणवत्तापूर्ण द्राक्षनिर्मितीसाठी कुशल शेतकरी, तंत्रज्ञ, कामगार कुठे आहेत? द्राक्षांच्या लगडलेल्या घडांना आश्वासक, संजीवक व जीवनप्रदायक रूप देण्यासाठी रसमाधुर्य टिकवून व रसायन मात्राविरहित स्वरूप देण्यासाठी विधिवत वायनरी उद्योग व द्राक्षशेतीचे विधिवत प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षणाची इथे आवश्यकता आहे.

आता वैद्यकीय शिक्षण व कृषी शिक्षण देणाऱ्या महाराष्ट्राच्या शेजारील राज्यात आणि महाराष्ट्रात विद्यमान असलेल्या शिक्षणसंस्थांचा थोडा विचार करूया. महाराष्ट्राला लागून असलेल्या कर्नाटक, तमिळनाडू, आंध्र प्रदेश, गुजरात, केरळ या राज्यांच्या लोकसंख्येच्या तुलनेने महाराष्ट्राची लोकसंख्या कितीतरी जास्त आहे. महाराष्ट्रात लोकसंख्येच्या प्रमाणानुसार वैद्यकीय महाविद्यालये व कृषी महाविद्यालये निर्माण होणे अपेक्षित होते. परंतु लोकसंख्येच्या मानाने अल्प प्रमाणात या संस्था निर्माण करण्यात आल्या. त्यामुळे वैद्यकीय आणि कृषी क्षेत्रातसुद्धा आसपासच्या राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्र पर्यायाने नाशिक बरेच मागे आहे. शैक्षणिक महाराष्ट्राच्या शेजारील राज्यात वैद्यकीय व कृषी शिक्षण प्रदान करणाऱ्या विद्यमान महाविद्यालयांच्या संख्येवर दृष्टी टाकल्यास वैद्यक आणि कृषी क्षेत्रातही महाराष्ट्र पर्यायाने नाशिकची काय स्थिती आहे, याची खाली दिलेल्या तक्त्यावरून कल्पना येऊ शकते.

| राज्याचे नाव | MBBS | BAMS | BioMedical | Dental | Agri. | Nursing |
|---|---|---|---|---|---|---|
| कर्नाटक | ४० | ४७ | ०७ | ५१ | २५ | २९५ |
| तमिळनाडू | २४ | ०५ | ३३ | २८ | ७५ | ९२ |
| आंध्र प्रदेश | ३० | १७ | १२ | १७ | १२५ | ५० |
| गुजरात | २२ | २१ | ०८ | १४ | २२ | ३६ |
| महाराष्ट्र | ४२ | ६४ | १३ | ४१ | ७६ | ६५ |
| केरळ | ८१ | १८ | ३२ | २४ | २२ | १४५ |
| एकूण संख्या | २३९ | १७२ | १०५ | १७५ | ३४५ | ६८३ |

(शब्दांकन : संजीव एस. अहिरे, जनसंपर्क अधिकारी, के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक)

दै. सकाळ, दि. १५-०३-२०१८

कल्पकतेला वाव | क. का. वाघ शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे उपक्रम; देशभरातील ७०० विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे सादरीकरण

# वैज्ञानिक आविष्कारांचा 'कर्मवीर एक्स्पो'

प्रतिनिधी | नाशिक

तंत्रज्ञानाच्या या युगात कंपन्यादेखील विद्यार्थी निवड करताना अभ्यासात मिळणाऱ्या गुणांपेक्षा कल्पकतेमध्ये जास्त रुची घेतात. त्यानुसार सतत नावीन्याचा शोध घेणे, कामामध्ये समाधान शोधणे या गोष्टींवर भर द्यायला हवा, असे प्रतिपादन कोसो इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक गौरव गुप्ता यांनी केले.

क. का. वाघ शिक्षण संस्थेच्या क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे 'आयटी-कर्मवीर एक्स्पो'चे आयोजन केले गेले आहे. या एक्स्पोच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक आयुष्यात नवीन शोध आणि कल्पकतेचे महत्त्व समजावून सांगितले. यानंतर विद्युत विभागप्रमुख डॉ. बी. इ. कुशारे यांनी विद्यार्थ्यांना एक्स्पोसारख्या प्रदर्शनांकडे नवीन आयुष्यासाठी चालून आलेली संधी म्हणून पाहण्याचा सल्ला दिला. कर्मवीर एक्स्पोमध्ये देशभरातून आलेल्या तब्बल ७०० विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. एकूण १२१ प्रकल्पांमध्ये वीजनिर्मिती, कचरा व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, वीज बचत, वाहन आणि वाहतूक सुरक्षा, इलेक्ट्रिक एनर्जीवर चालणारी वाहने यांसारखे विषय सादर करण्यात आले आहेत. यासाठी औरंगाबाद, नागपूर, इंदोर, केरळ, दक्षिण भारत, उत्तर भारत या भागातून विद्यार्थी आपले चलत यंत्र घेऊन सहभागी होत आहेत. स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक चलत यंत्र हे अपारंपरिक ऊर्जास्रोत आणि सामाजिक उपयोग लक्षात घेऊन तयार केलेले आहेत. याच बरोबर पोस्टर प्रदर्शन, फोटोग्राफी यांसारखे कार्यक्रमदेखील या ठिकाणी घेतले जाणार आहेत. या सगळ्या स्पर्धांसाठी तब्बल अडीच लाखांची बक्षिसेही यंदा दिली जाणार आहेत.

उद्घाटनप्रसंगी मंचावर मनीष गुप्ता (व्यवस्थापकीय संचालक पॉवरिका), क. का. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, विद्युत विभागप्रमुख डॉ. बी. इ. कुशारे, अपूर्वा जाखडी, डी. एम. मेथीकर, अविनाश शिरोडे आदींसह मान्यवर व विद्यार्थी, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## या प्रकल्पांनी वेधले लक्ष; यंदा विविध स्पर्धांसाठी तब्बल अडीच लाखांची बक्षिसे



### ऑटोमॅटिक हॅण्डब्रेक सिस्टिम

अनेकदा हॅण्डब्रेक न लावण्याने अपघात होतात. हे टाळण्यासाठी ऑटोमॅटिक हॅण्डब्रेक सिस्टिम तयार केली गेली आहे. गाडी सुरू केल्यावर हा हॅण्डब्रेक आपसूक खाली केला जातो, म्हणजेच हॅण्डब्रेक उघडण्यासाठी वेगळे प्रयत्न करावे लागत नाहीत. त्याचबरोबर गाडी बंद केल्यानंतर हॅण्डब्रेक ओढलादेखील जातो. जेणेकरून गाडी पुढे सरकणार नाही. कोणत्याही वेळी गाडीसाठी रस्त्यात अडथळा आला किंवा गाडी अचानक थांबली तर हा हॅण्डब्रेक ऑपरेट होतो. अतिशय साधे आणि परवडणारे रिले, कंट्रोलर्स वापरून हे मॉडेल तयार केले गेले आहे. गुरूगोविंद सिंग अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मयूर अस्वले, प्रतीक शितोळे आणि पीयूष कासार या विद्यार्थ्यांचा यामध्ये सहभाग आहे.



### स्लायडिंग सेगमेंटल रिटेनिंग वॉल

दरड कोसळून गावाचे नुकसान होऊ नये म्हणून चक्क सरकणारी काँक्रीटची भिंत तयार केली आहे. एका बाजूने या भिंतीवर दरड पडू लागल्यास ही भिंत काहीअंशी उंच असणाऱ्या भिंतीच्या पायावरून वर सरकेल, जेणेकरून या भिंतीवर दरड अडकवली जाईल. भिंत पुढे सरकू लागताच गावामध्ये सेन्सरद्वारे हाय अलर्ट अलार्म वाजेल आणि गावकऱ्यांना विस्थापणाच्या सूचना दिल्या जातील. या प्रकल्पाचा पेटंटदेखील घेतला गेला आहे. यासाठी एस. एन. जे. बी अभियांत्रिकीच्या बबलू जगताप, प्रणाली हांडगे, समीक्षा घोगरे, अंकिता चोभरकार, मधुर गुजराथी यांनी काम केले आहे.



### कचऱ्यापासून वीजनिर्मिती

घर चालवण्यासाठी लागणारे इंधन, वीज आणि कचरा व्यवस्थापन हे प्रश्न सोडवण्यासाठी एकत्रित उपाय करणारा हा प्रकल्प आहे. यामध्ये कचरा बंद पेटीत जाळून, त्यावर रासायनिक प्रक्रिया करून गॅस तयार केला जातो. हा गॅस इंधन म्हणून स्वयंपाक घरात वापरला जाईल. याशिवाय तयार होणारी ऊर्जा किंवा उष्णता ही एनर्जी कन्व्हर्टर वापरून मेकॅनिकल एनर्जीमध्ये आणि पुढे या यांत्रिक ऊर्जेचे रूपांतर विद्युत ऊर्जेमध्ये करता येईल असा प्रकल्प मातोश्री महाविद्यालयाच्या पुष्पराज कदम, आदित्य इहाळे, वैभव राजोळे यांनी तयार केला आहे.

### ब्लाइंड असिस्टन्स प्रोजेक्ट

अंध व्यक्तींना स्वावलंबी करण्यासाठी महत्वाचा हा प्रकल्प आहे. यामध्ये व्यक्तीला सेन्सर असलेले उपकरण दिलेले आहे. ज्या माध्यमातून रस्त्यावर होणाऱ्या हालचाली सेन्सर त्याला आवाजाच्या माध्यमातून सांगेल आणि त्या व्यक्तीला अडथळे पार करण्यास मदत होईल. याशिवाय त्या व्यक्तीने एकदा ओळखल्या व्यक्तीचे चित्रदेखील त्यांच्या लक्षात राहणार असून, पुन्हा ती व्यक्ती समोर आल्यास सेन्सर आधीच येणाऱ्या व्यक्ती बद्दल माहिती देईल. तसेच या सेन्सरद्वारे ती व्यक्ती अडचणीत असल्यास पूर्वीपासून सिस्टिममध्ये लोड केल्या गेलेल्या क्रमांकाराव इमर्जन्सी मेसेज आणि अंध व्यक्तीचे लोकेशन पाठविले जाईल. बंगलोर येथील बंगलोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या पृथ्वी, हितेश, शमा आणि संदेश यांनी हा प्रकल्प तयार केला आहे.

### इंधनाशिवाय उडविले जाणारे सॅटेलाइट

भारतामध्ये आजपर्यंत सोडले गेलेले विविध उपग्रह हे इंधनाचा वापर करून सोडले गेले आहेत. या इंधनाचा होणार प्रचंड वापरदेखील कुठेतरी उपग्रह कमी असण्यास कारणीभूत ठरतो. हे कारण नाहीसे करण्यासाठी विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रिक म्हणजेच विद्युत ऊर्जेवर चालणारे सॅटेलाइट लाँचर तयार केले आहे. या माध्यमातून एका विशिष्ट प्रकारची ऊर्जा संकलित होऊन त्याच्या जोरावर मिनी आणि मायक्रो सॅटेलाइट अंतराळात काही किलोमीटर लांबपर्यंत सोडता येणे शक्य आहे. या प्रकल्पाचे डेमो मॉडेल काम करताना या प्रदर्शनात पाहायला मिळते. बंगळुरूच्या आर्शिथ आर. जी. आणि संदेश चिपळूणकर यांनी हा महत्त्वपूर्ण प्रकल्प तयार केला आहे.

दै. दिव्य मराठी, दि. २४-०३-२०१८



के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित वैज्ञानिक प्रदर्शनातील प्रकल्प पाहताना मान्यवर.

**तंत्रज्ञान** | के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात वैज्ञानिक प्रदर्शन

# 'टेलिकेनिसीस'द्वारे संशोधनवृत्तीला चालना

प्रतिनिधी | नाशिक

स्पर्धेच्या युगात पुस्तकी ज्ञानासह प्रत्यक्ष कृतीवरही भर देत कौशल्य विकास साधणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित टेलिकेनिसीस या वैज्ञानिक उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला चालना मिळाली.

इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित या दोन दिवसीय उपक्रमाला बुधवारी (दि. २१) प्रारंभ झाला. यात प्रोजेक्ट मेकिंग, पोस्टर, क्विज, सी-प्रोग्रामिंग, सर्किट बिल्डिंग आदी स्पर्धा होत आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून टेलिकॉमचे जनरल मॅनेजर नितीन महाजन व विभागीय वरिष्ठ व्यवस्थापक प्रदीप शेणॉय उपस्थित होते. विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांनी यात सहभाग घेतला आहे. उपक्रमासाठी विभागप्रमुख डॉ. डी. एम. चांदवडकर, प्रा. ए. पी. कौर, एस. ए. झाल्टे, विशाल जैस्वाल, हर्ष पटेल प्रयत्नशील आहेत.

## हे प्रोजेक्ट ठरले लक्षवेधी...



**शेतीसाठी आधुनिक फवारणी ड्रोन :** पिकांवर कीटकनाशकाची फवारणी करताना शेतकऱ्यांना खूप कष्ट करावे लागतात. श्वसनाद्वारे ते शरीरात गेल्यास मृत्यूही ओढवू शकतो. या सर्व गोष्टी लक्षात घेत चांदवडच्या 'एसएनजेबी'च्या विद्यार्थ्यांनी फवारणी करण्यासाठी आधुनिक ॲग्रीकल्चर ड्रोन तयार केले.



**आपत्कालीन सूचना पाठवणारे यंत्र :** पूर वा अन्य आपत्कालीन परिस्थितीत संभाव्य नुकसान टाळण्यासाठी गोएसोच्या आर. एच. सपट महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी आपत्कालीन सूचना पाठवणारे विशेष यंत्र तयार केले आहे.

# के. के. वाघ महाविद्यालयात राज्यस्तरीय कार्यशाळा उत्साहात



**नाशिक** । के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात आय. टी. विभागात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत 'इंटरनेट ऑफ थिंग्स : व्याप्ती आणि अनुप्रयोग' या विषयावर राज्यस्तरीय दोन दिवसाची कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेत नाशिकमधील आणि नाशिक बाहेरील महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. परीक्षित महले, सीईओ, एसकेएन, पुणे, तेजस रावळ, अनिकेत थोरवे, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, विभागप्रमुख डॉ. प्रीती भामरे, कार्यशाळा समन्वयक प्रा. संतोष पूरकर यांच्या उपस्थितीत पार पडले.

**दै. देशदूत, दि. २३-०३-२०१८**

शिबिरे आदी मुद्द्यांभोवती हा अर्थसंकल्प धारणा आहे. यामुळे यंदाच्या तब्बल

# वाघ कॉलेजात रंगणार 'इक्विनॉक्स'

## दोन दिवसीय राष्ट्रस्तरीय महोत्सव

महाराष्ट्र टाइम्स मीडिया पार्टनर

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

के.के. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग एज्युकेशन अँड रिसर्च, कम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया आणि डिबगर्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने 'इक्विनॉक्स २०१८' या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेचे आयोजन केले आहे. २१ मार्च रोजी या उपक्रमाचे उद्घाटन होईल तर २२ मार्च रोजी दुपारी समारोप सत्र होईल.

इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित या दोन दिवसीय तांत्रिक महोत्सवात एकूण १० प्रकारच्या स्पर्धा पार पडणार आहेत. या स्पर्धांमध्ये सोर्स कोड, स्टॉक माईंडर, मगल क्विडीच, शटर बग अशा विविध स्पर्धा होणार आहेत. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचे मीडिया पार्टनर आहे.

उद्घाटन सत्रात विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. यामध्ये डिजीटल इम्पॅक्ट स्क्वॉयर, टीसीएस, नाशिकचे संचालक हसित काजी, 'महाराष्ट्र टाइम्स'चे निवासी संपादक शैलेंद्र तनपुरे आणि मुंबई येथील ऋषभ रामदिया यांची उपस्थिती राहणार आहे. उद्घाटन समारंभानंतरच्या सत्रात हसित काजी हे 'बदलते तंत्रज्ञान' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधतील. यावेळी 'रेड एक्स इनोव्हेशन क्लब'ची स्थापना आणि 'व्हाईट स्पॉट' या माहितीपट व लघु चित्रपट निर्मिती क्लबची स्थापनाही करण्यात येणार आहे. या उपक्रमांच्या आयोजनासाठी प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, संगणक विभागाचे प्रमुख तसेच उपप्राचार्य डॉ. एस. एस. साने आणि प्रा. वासुदेव पिंगळे यांचे सहकार्य लाभते आहे.

**दै. महाराष्ट्र टाइम्स, दि. १९-०३-२०१८**

# वाघ कॉलेजच्या विद्यार्थ्यांना संधी

**नाशिक :** के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजात आयोजित कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये इंजिनीअरिंगच्या तीन विद्यार्थ्यांना दहा लाखांचे वार्षिक पॅकेज मिळाले आहे. यंदाच्या कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांना मिळालेली ही मोठी संधी आहे. या कॉलेजमध्ये या अगोदर टीसीएस, केपीआयटी या कंपन्यांनी कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन केले होते. यात सुमारे ५० हून अधिक विद्यार्थ्यांना प्लेसमेंटची संधी मिळाली होती. दरम्यान एनव्हिडिया या कंपनीतर्फे आयोजित कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये उमेदवार ऑनलाइन टेस्ट, टेक्निकल टेस्ट आणि त्यानंतर वैयक्तिक मुलाखत फेरी या टप्प्यांना सामोरे गेले. यात कॉम्प्युटर शाखेचे विद्यार्थी समर्पित मसिआ, शुभम दाधिच आणि भूषण गोसावी या तिघांना संधी मिळाली. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी केले आहे. के. के. वाघ पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांसाठी किर्लोस्कर कंपनीच्या वतीने आयोजित कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये गणेश आंदुरे, गौरव भुसनार, अजय क्षीरसागर, कौस्तुभ सोनवणे, रमेश सिंग, सुनील बोरसे, प्रज्वल जाधव, ऋषिकेश गाढवे करण कातकर या विद्यार्थ्यांची निवड झाली.

**दै. महाराष्ट्र टाइम्स, दि. २७-०३-२०१८**

त्यासाठी केंद्राकडून प्रत्येकी सहा महाविद्यालयांचे उन्नतीकरण करून मान्यता दिली आहे. २०२२ पर्यंत

### डॉ. गायकर यांचे प्रतिपादन; क. का. वाघ संस्थेचा पदवीदान समारंभ

# विद्यार्थ्यांसाठी केवळ पदवी नव्हे, विविध प्रकारचे कौशल्यही महत्त्वाचे

प्रतिनिधी । नाशिक

भारत आजही विकसनशील अवस्थेत आहे. ग्रामीण भागात सुव्यवस्था नाही. पाणी व्यवस्थापन, कृषी व्यवस्थापन, वैद्यकीय या सुविधा आजही अपुऱ्या आहेत. विद्यार्थ्यांसाठी फक्त पदवी नाही तर कौशल्यही महत्त्वाचे आहे. कोणतेही स्वप्न पूर्ण करण्यासाठी आत्मपरीक्षण करावे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. जी. गायकर यांनी केले.

क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात सोमवारी (दि. १९) पदवीदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. गायकर म्हणाले की, आजचे विद्यार्थी परीक्षार्थी बनले असून, कौशल्य अंगी किती आले याचा विचार होत नाही. ग्रामीण भागात पदवी संपादन केलेल्या विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य वापरून तेथील लोकांना सेवा उपलब्ध करून दिल्यास त्या ठिकाणी विकास होईल. कौशल्य वापरून सेवा दिल्यास पाणी, कृषी आणि हॉस्पिटल या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर युवक संधी निर्माण करू शकतो. कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. क. का. वाघ शिक्षण संस्थेच्या सहा महाविद्यालयातील सुमारे अकराशे विद्यार्थ्यांना या कार्यक्रमात पदवी प्रदान करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, संस्थेचे विश्वस्त डॉ. शिरीष साने, डॉ. ए. पी. राजपूत, डॉ. बी. जी. वाघ, व्ही. एस. शिरसाठ, डॉ. आर. एम. चिंतामणी, डॉ. बी. व्ही. कर्डिले, मकरंद हिंगणे, प्रा. नगरकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

**दै. दिव्य मराठी, दि. २०-०३-२०१८**

# विद्यार्थ्यांनी उद्योजकतेकडे वळावे

### उद्योजक अविनाश सिसोदे यांचे आवाहन

म. टा. प्रतिनिधी, नाशिक




विद्यमान युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. तंत्रज्ञानाच्या आधाराशिवाय या युगात प्रगती साधणे शक्य नाही. तंत्रज्ञानाची कास धरून विद्यार्थ्यांनी उद्योगांकडे वळावे. उद्योगांमधून नवीन संधी विद्यार्थ्यांनी निर्माण कराव्यात, असे आवाहन उद्योजक अविनाश सिसोदे यांनी केले. के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजच्या मेकॅनिकल विभागाच्या वतीने 'मेकहेवन २०१८' या उपक्रमाचे आयोजन केले होते. या उपक्रमात महाराष्ट्र टाइम्स मीडिया पार्टनर आहे.

या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमासाठी यंदा 'मोटरपोर्ट्स' ही संकल्पना ठेवण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी टेक्निकल आणि नॉन टेक्निकल स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. टेक्निकल स्पर्धांमध्ये पेपर प्रेझेन्टेशन बाइक मेनिया, रोबो रेस, रोबो सॉकर आदी स्पर्धांचा पार पडल्या. शहरातील विविध कॉलेजमधील विद्यार्थीही यात सहभाग झाले होते. उद्घाटन कार्यक्रमात मेकहेवनचे शिक्षक समन्वयक प्रा. अमित भगुर यांनी सर्वांचे स्वागत केले व सर्व सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून अविनाश शिसोदे, मेकॅनिकल विभाग प्रमुख प्रा. मिलिंद मुरुगकर, प्रा. महेश शेलार आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स मीडिया पार्टनर

# अपयशाला कणखरपणे सामोरे जा

### हसीत काजी यांचा विद्यार्थ्यांना संदेश

म. टा. प्रतिनिधी, नाशिक




जीवनात यशाला महत्त्व असतेच. ते नाकारून चालणार नाही. पण अपयश हीसुद्धा यशाचीच दुसरी बाजू आहे. अपयशालाही कणखरपणे सामोरे जायला विद्यार्थ्यांनी शिकले पाहिजे, असा संदेश टीसीएस डीएक्सच्या नाशिक विभागाचे प्रमुख हसीत काजी यांनी विद्यार्थ्यांना दिला. महाराष्ट्र टाइम्स यासाठी मीडिया पार्टनर होते.

के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजमधील डीबगर्स क्लब व सीएसआय स्टुडंट शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने 'इक्विनॉक्स : २०१८' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी काजी विद्यार्थ्यांशी बोलत होते. काजी यावेळी म्हणाले, बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञान यांची सुरेख सांगड घालत के. के. वाघ कम्प्युटर इंजिनीअरिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी टीसीएस- डिस्कच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या महिला व बालकल्याण मंत्रालयास, मुंबईच्या लोकलसाठी उपयुक्त सॉफ्टवेअर्सची निर्मिती केली आहे, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले. विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रतिभेला इक्विनॉक्स सारखे उपक्रम प्रेरणा देतात. यातूनच 'रोबोकोन' व टाटा क्रुसीबल हॅकेथॉनमध्ये सादर करण्यात आलेला स्मार्ट अॅम्ब्युलन्स असे प्रोजेक्ट्स जन्माला येतात, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी व्यासपीठावर आरईडीएक्सचे ऋषभ रामदिया, के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजचे विश्वस्त, उपप्राचार्य, व विभाग प्रमुख आदी उपस्थित होते. या स्पर्धेचे आयोजन बारा वर्षांपासून केले जाते. या कार्यक्रमाचा प्रारंभ हसित काजी, ऋषभ रामदिया, उपप्राचार्य व संगणक प्रमुख डॉ. एस. एस. साने यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आले. या राष्ट्रस्तरीय महोत्सवात विद्यार्थ्यांनी नवनवीन संकल्पना सादर केल्या. यावेळी आयोजित सोर्स कोड, स्टॉक माइन्डर, शटर बग, क्विज, व्हाइट कॉलर आदी स्पर्धांना विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला. यामध्ये सुमारे हजारावर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

काजी यांच्या हस्ते 'व्हाइट स्पॉट' या क्लबचे तर ऋषभ रामदिया यांच्या हस्ते 'रेडेक्स' या इनोव्हेशन क्लबचेदेखील उद्घाटन झाले. क्लबतर्फे समाजातील प्रश्न घेऊन विद्यार्थ्यांनी ते सोडवायचा प्रयत्न करण्याचे आव्हान रामदिया यांनी केले. विद्यार्थी प्रतिनिधींनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. निलय जैस्वाल व चिन्मयी शालिग्राम यांनी सूत्रसंचालन केले. आभार प्रदर्शन अनुजा दीक्षित व सुमीत थोरात यांनी केले. प्रा. शहाणे, प्रा. कमलापूर, प्रा. बानाईत, प्रा. कोळपकर, प्रा. कानडे, प्रा. भिसे, प्रा. पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**दै. महाराष्ट्र टाइम्स, दि. २३-०३-२०१८**

आवाहन सर्कसचे मालक नीरज गाडगे यांनी केले आहे.

## के. के. वाघ अभियांत्रिकीत फोर्स परीक्षा यशस्वी



नाशिक : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्थापत्य विभागातर्फे फोर्स २०१८ ही दोन दिवसीय राष्ट्रीयस्तरावरील स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली. स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धेची थीम सॅनिटेशन फॉर ऑल ही ठेवण्यात आली होती. त्याअंतर्गत विविध तांत्रिक स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी मेटाचे सहसंचालक व्ही. पी. राम यांनी सॅनिटेशनची जनजागृती होणे आवश्यक असल्याचे सांगितले. महाविद्यालयाच्या सफाई कामगारांना सॅनिटेशन कीटचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. प्रदीप जाधव व स्पर्धेचे समन्वयक प्रा. सुहास पंडित, प्रा. अभिजित पवार, प्रा. अभिजित केसकर, प्रा. स्नेहल चौधरी आणि सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व निशांत पवार, अमित पाटील, पवन तरले, शुभम जिरे आदि उपस्थित होते.

दै. लोकमत, दि. २५-०३-२०१८